यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191

प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र / Prof. Ram Takwale Research & Development Centre

# कार्यक्रमाचा अहवाल

**विषय : महाज्ञानदीप प्रकल्प भेट व मार्गदर्शन**
**ठिकाण : Yash-Inn Conferance Hall**
**तारीख : दि. ०९ मे २०२५** **वेळ : सायंकाळी ०५:०० वाजता**

दि. ०९ मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन हे **महाज्ञानदीप प्रकल्प भेट व मार्गदर्शन** या विशेष कार्यक्रमासाठी आले होते. मंत्री महोदयांनी महाज्ञानदीप प्रकल्पास भेट, मार्गदर्शन आणि महाज्ञानदीप इमारतीचे लोकार्पण केले.

सायं. ठीक ०५:०० वाजता महाराष्ट्र गीत व महाराष्ट्र गीताने सदर कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर भारतीय ज्ञान परंपरा e-content Pendrive चे मा. मंत्री महोदयांना औपचारिकरित्या हस्तांतरण करण्यात आले. हा क्षण विद्यापीठासाठी अभिमानाचा ठरला.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये मा. कुलगुरू यांनी महाज्ञानदीप प्रकल्पाच्या आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. तसेच महाज्ञानदीप अंतर्गत महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील सुमारे ३०० प्राध्यापकांना प्रशिक्षण दिल्याची आणि एकुण १००० प्राध्यापकांना प्रशिक्षण देणार असल्याची माहिती दिली. तसेच महाज्ञानदीप पोर्टलचा IKS Generic हा पहिला MOOC जून २०२५ पासून महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांतील पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे असे सांगितले. यापुढे महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांनी तयार केलेले MOOC महाज्ञानदीप पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले जातील, असे देखील नमूद सांगितले.

प्रास्ताविकानंतर महाज्ञानदीप प्रकल्प प्रमुख, इमरटस प्रो. कविता साळुंके यांनी "महाज्ञानदीप पुढील प्रवास" या विषयी सादरीकरण केले. या सादरीकरणात या प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबतची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली.

यानंतर मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रातील नवकल्पना, डिजिटल शिक्षणाचे महत्त्व आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीमध्ये "महाज्ञानदीप" प्रकल्पाच्या उच्च शिक्षणातील भविष्यात होणाऱ्या महत्त्वपूर्ण योगदानाबाबत आपले विचार मांडले. त्यांच्या प्रेरणादायी भाषणाने उपस्थितांना नवीन ऊर्जा मिळाली.

विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांचे आभार मानले. शेवटी कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. उपस्थित प्राध्यापकवर्ग, सर्व शैक्षणिक संयोजक, IKS MOOC निर्मितीत काम केलेले सर्व शैक्षणिक, प्रशासकीय, तांत्रिक कर्मचारी आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यासाठी हा एक संस्मरणीय अनुभव ठरला.

मा. कुलगुरू कार्यालय
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
अंतर्गत आवक क्र.: VC 11472
दि. 26/ 5 /2025

या कार्यक्रमानंतर मा. ना. श्री. चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते "महाज्ञानदीप" प्रकल्प इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला. तसेच या इमारतीच्या प्रांगणात त्यांच्या हस्ते देशी वृक्षाची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, मा. प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, म. कुलसचिव डॉ. दिलीप भरड, "महाज्ञानदीप" प्रकल्प प्रमुख इमरटस प्रो. कविता साळुंके, प्रा. गणेश लोखंडे, सर्व संचालक, प्राध्यापक आणि शैक्षणिक संयोजक यांची उपस्थिती होती. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. राम ताकवले संशोधन केंद्रातील शैक्षणिक संयोजक डॉ. वसुदेव व्ही. राऊत यांनी केले.

**डॉ. वासुदेव व्ही. राऊत**
शैक्षणिक संयोजक,
प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र

मार्फत -

**इमरटस प्रो. कविता साळुंके**
प्रमुख, महाज्ञानदीप प्रकल्प

सोबत :

१. कार्यक्रमाचे परिपत्रक,
२. कार्यक्रमाचे बॅनर,
३. कार्यक्रमपत्रिका,
४. वर्तमानपत्रातील बातम्या,
५. निवडक फोटो

मा. कुलगुरू

२०/४/२४

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_prtrndc@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230191
प्रा. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र / Prof. Ram Takwale Research & Development Centre

PRTRNDC/2025/ 451

Date: 28/04/2025

# परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी आपल्या विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रो. राम ताकवले यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणेसाठी प्रो. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्रामार्फत प्रो. संतोष पांडा यांचे एक व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सर्वांनी सदर कार्यक्रमास दि. १३ मे २०२५ रोजी दुपारी १२:०० वा. शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉलमध्ये उपस्थित राहावे.

कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | कार्यक्रम | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १. | चहापान | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉलच्या बाहेर | ११:३० ते १२:०० |
| २. | प्रो. संतोष पांडा यांचे व्याख्यान | शैक्षणिक इमारत ऑडीटोरीयम हॉल | १२:०० ते ०१:०० |

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीसाठी :

- मा. कुलगुरू कार्यालय
- मा. प्र. कुलगुरू कार्यालय

प्रत उचित कार्यवाहीसाठी :

- सर्व विभाग / केंद्र / कक्ष / विद्याशाखा संचालक यांना विनंती की, हे परिपत्रक आपल्या अधिनस्थ शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी व सहकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.
- प्रमुख जनसंपर्क कक्ष – सदर कार्यक्रमाची बातमी प्रसिद्ध करावे व छायाचित्र काढणे.
- प्रमुख दृकश्राव्य निर्मिती केंद्र – सदर कार्यक्रमाचे ऑडीओ/व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे तसेच कार्यक्रमापूर्वी विद्यापीठ गीत व कार्यक्रमाचे शेवटी राष्ट्रीय गीत वाजविणे.
- प्रो. राम ताकवले संशोधन व विकसन केंद्र केंद्र – कार्यक्रमाचे आयोजन व चहापान व्यवस्था.

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)



# महाज्ञानदीप प्रकल्प
# भेट व मार्गदर्शन

## मा. श्री. चंद्रकांत दादा पाटील

मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**मा. प्रा. संजीव सोनवणे**
कुलगुरू

**मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन**
प्र-कुलगुरू

**श्री. दिलीप भरड**
कुलसचिव

**प्रो. कविता साळुंके**
संचालक, डिजिटल शिक्षण विद्याशाखा

• दिनांक : ०९ मे २०२५ • स्थळ : यश इन इमारत, ऑडिटोरियम हॉल, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील साहेब, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांची विद्यापीठ महाज्ञानदीप प्रकल्प, भेट व मार्गदर्शन... दि. ०९ मे २०२५ (सायं. ५.०० ते ६.३०)

## कार्यक्रम पत्रिका

| अ.क्र | वेळ | कार्यक्रम स्वरूप | संयोजन |
|---|---|---|---|
| १. | सायं. ५.०० | विद्यापीठात आगमन यशइन इमारत | मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील साहेब<br>मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य |
| २. | सायं. ५ .०० ते ५.१० | चहापान | यशइन इमारत ४ था. मजला व्हो.आय.पी. दालन |
| ३. | सायं. ५.१२ | कार्यक्रम स्थळ | यशइन सभागृह |
| ४. | सायं.५.१२ ते ५.१४ | सूत्रसंचालन | डॉ वसुदेव राऊत |
| ५. | सायं. ५.१४ ते ५.१८ | महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीत | श्री धनंजय देशमुख - AVC विभाग |
| ६. | सायं. ५.१८ ते ५. २५ | मा. मंत्री महोदय यांचे स्वागत आणि भारतीय ज्ञान परंपरा E - Content Pendrive मा. मंत्री महोदय यांना हस्तांतरण | प्रा. संजीव सोनवणे, मा.कुलगुरू यांच्या हस्ते |
| ७. | सायं. ५.२५ ते ५.३५ | प्रास्ताविक | प्रा. संजीव सोनवणे, मा. कुलगुरू |
| ८. | सायं.५.३५ ते ५.४५ | महाज्ञानदीप पुढील प्रवास सादरीकरण | प्रा.कविता साळुंके, महाज्ञानदीप प्रकल्प प्रमुख |
| ९. | सायं. ५.४५ ते ६.०० | मार्गदर्शन | मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील साहेब<br>मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य |
| १०. | सायं.६.०१ ते ६.०३ | आभार | श्री दिलीप भरड मा. कुलसचिव |
| ११. | सायं. ६.०४ ते ६.०५ | राष्ट्रगीत | श्री धनंजय देशमुख - AVC विभाग |
| १२. | सायं. ६.०५ | यशइन इमारत | एक ग्रुप फोटो |
| १३. | सायं. ६.०६ ते ६.१५ | ॲक्वोकेंद्री लागवड प्रारंभ | डॉ. नितीन ठोके - ठिकाण शेतावर |
| १४. | सायं. ६.१५ ते ६.२५ | यशभारती इमारत | महाज्ञानदीप इमारत हस्तांतरन समारंभ |
| १५. | सायं. ६.२५ | यशभारती इमारत | देशी वृक्ष लागवड प्रकल्प - एक वृक्ष लागवड |
| १६ | सायं. ६.३० | प्रयाण | |

सकाळ YCMOU PRO SK M11 120525

# मुक्त विद्यापीठात महाज्ञानदीप इमारतीचे लोकार्पण

## महाज्ञानदीप ऑनलाइन शिक्षण प्रकल्पाचे मुख्यालय कार्यान्वित

■ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. ११ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवारातील 'महाज्ञानदीप' इमारतीचे लोकार्पण उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. ९) झाले. 'महाज्ञानदीप' ऑनलाइन शिक्षण पोर्टल प्रकल्पाचे मुख्यालय या इमारतीत आहे.

या वेळी कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्य व्यवस्थापन मंडळ सदस्य महेश दाबक, कुलसचिव दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळाच्या सदस्या प्रा. डॉ. संजीवनी महाले, डिजिटल शिक्षण विभागाच्या संचालिका प्रा. कविता साळुंके, गणेश लोखंडे उपस्थित होते.



नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महाज्ञानदीप इमारतीच्या लोकार्पणानिमित्त झालेल्या कार्यक्रमात बोलताना उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील. शेजारी कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे आदी.

मंत्री पाटील म्हणाले, की विद्यार्थ्यांना केवळ गुण किंवा पदवी मिळण्यासाठी 'महाज्ञानदीप' पोर्टल नसून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या गाभ्यानुसार विद्यार्थ्यांना जीवनात, व्यवहारात उपयोगी पडणारे जागतिक व उच्च दर्जाचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने देण्याचा उद्देश आहे.

कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले, की प्रकल्पासाठी मुक्त विद्यापीठासह मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुणे), छत्रपती शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) व एसएनडीटी विद्यापीठ (कोल्हापूर) यांचा सहभाग आहे. येत्या काळात शैक्षणिक प्रकल्पाचा विस्तार करीत सहभागी विद्यापीठ मिळून 'शैक्षणिक कंपनी' स्थापन करणार असल्याचे सांगण्यात आले.

डॉ. कविता साळुंके यांनी 'महाज्ञानदीप' ऑनलाइन शिक्षण पोर्टलविषयी सादरीकरण केले. डॉ. वासुदेव राऊत यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले.

Nashik, Main
12/09/2025 Page No. 11

दैनिक
लोकनामा

# 'महाज्ञानदीप'द्वारे व्यवहारोपयोगी दर्जेदार शिक्षण

## उच्च-तंत्रशिक्षण मंत्री पाटील : मुक्त विद्यापीठात मुख्यालय इमारतीचे लोकार्पण

लोकनामा प्रतिनिधी

नाशिक : विद्यार्थ्यांना केवळ गुण किंवा पदवी मिळावी, यासाठी 'महाज्ञानदीप' पोर्टल नाही. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या गाभ्यानुसार, राज्यातील मराठी भाषिक व सर्वस्तरीय विद्यार्थ्यांना व्यवहारोपयोगी जागतिक दर्जाचे उच्च शिक्षण ऑनलाइन पद्धतीने देणे हा महाज्ञानदीप पोर्टलचा उद्देश आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी महाज्ञानदीप ऑनलाइन शिक्षण पोर्टल प्रकल्पासाठी मुख्यालय म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र




मुक्त विद्यापीठ आवारातील 'महाज्ञानदीप' या इमारतीचे लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्य व्यवस्थापन मंडळ सदस्य महेश दाबक, कुलसचिव दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या प्रा. डॉ. संजीवनी महाले, डिजिटल शिक्षण विभागाच्या संचालिका प्रा. कविता साळुंके, पोर्टलचे गणेश लोखंडे यावेळी उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी या प्रकल्पासाठी मुक्त विद्यापीठासह मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व एसएनडीटी विद्यापीठ कोल्हापूर यांचा सक्रिय सहभाग असल्याचे सांगितले. तसेच आगामी काळात शासन निर्देशानुसार, या शैक्षणिक प्रकल्पाचा विस्तार करत सहभागी विद्यापीठे मिळून शैक्षणिक कंपनी स्थापन करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्रा. डॉ. साळुंके यांनी पोर्टलचे माहितीपूर्ण सादरीकरण केले. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ आवारात देशीवृक्ष लागवडीचा शुभारंभ झाला. डॉ. वासुदेव राऊत यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले.

नवभारत
YCMOU PRO NVBH S4 150525

# मुक्त विवि परिसर में 'महा ज्ञानदीप' भवन का उद्घाटन



■ नाशिक, ब्यूरो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विवि परिसर में 'महा ज्ञानदीप' भवन का उद्घाटन महाराष्ट्र राज्य के उच्च और तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल ने किया. यह भवन महाराष्ट्र सरकार की महत्वाकांक्षी ऑनलाइन शिक्षा पोर्टल परियोजना 'महा ज्ञानदीप' के मुख्यालय के रूप में बनाया गया है. इस अवसर पर कुलपति प्रो. संजीव सोनवणे, प्रतिकुलपति डॉ. योगेंद्र सिंह बिसेन, नई राष्ट्रीय शिक्षा नीति राज्य प्रबंध मंडल के सदस्य महेश दाबक, कुलसचिव दिलीप भरड, प्रो. डॉ. संजीवनी महाले, प्रो. कविता साळुंके, गणेश लोखंडे, विभिन्न संकायों के निदेशक, प्राध्यापक, प्रशासनिक अधिकारी व कर्मचारी तथा शैक्षणिक समन्वयक उपस्थित थे.

## उच्च गुणवत्ता वाली शिक्षा ऑनलाइन प्रदान करना उद्देश्य

विश्वविद्यालय के नए इस भवन के सभागार में एक विशेष कार्यक्रम आयोजित किया गया. राज्य के उच्च एवं तकनीकी शिक्षा मंत्री पाटिल ने कहा कि यह 'महा ज्ञानदीप' पोर्टल विद्यार्थियों को सिर्फ अंक या डिग्री प्राप्त करने के लिए नहीं है, बल्कि नई राष्ट्रीय शिक्षा नीति के मूल के अनुसार इसका मुख्य उद्देश्य वैश्विक और उच्च गुणवत्ता वाली शिक्षा ऑनलाइन प्रदान करना है जो दुनिया भर के सभी क्षेत्रों के मराठी भाषी विद्यार्थियों के लिए जीवन और व्यवसाय में उपयोगी होगी. इसका उद्देश्य भारतीय ज्ञान प्रणाली (आईकेएस) के तहत छात्रों, विशेषकर नई पीढ़ी के बीच हमारी उज्ज्वल भारतीय परंपरा के प्रति जागरूकता और गौरव पैदा करना भी है.

Nashik plus Edition
May 15, 2025 Page No. 4
Powered by: navbharatlive.com

गांवकरी
YCMOU PRO GK P4
120525
www.gaonkari.net
12 May 2025 - Page 4

# मुक्त विद्यापीठ आवारातील 'महाज्ञानदीप' इमारतीचे लोकार्पण

नाशिक : प्रतिनिधी



[illegible]

# महाराष्ट्र शासनाच्या 'महाज्ञानदीप' ऑनलाईन शिक्षण प्रकल्पासाठी मुख्यालय म्हणून मुक्त विद्यापीठ आवारातील 'महाज्ञानदीप' इमारतीचे लोकार्पण



लोकमंथन प्रतिनिधी

नाशिक। महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी अशा 'महाज्ञानदीप' या ऑनलाईन शिक्षण पोर्टल प्रकल्पासाठी मुख्यालय म्हणून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आवारातील 'महाज्ञानदीप' या इमारतीचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे, प्र- कुलगुरु डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्य व्यवस्थापन मंडळ सदस्य श्री. महेश दाबक, कुलसचिव श्री. दिलीप भरड, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा. डॉ. संजीवनी महाले, डिजीटल शिक्षण विद्याशाखा संचालिका प्रा. कविता साळुंके, श्री. गणेश लोखंडे प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस महाज्ञानदीप पोर्टल यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थितांशी विद्यार्थ्यांच्या [illegible] बोलताना राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मा.ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की विद्यार्थ्यांना केवळ मुक्त शिक्षण पद्धती शिकवी यासाठी हे 'महाज्ञानदीप' पोर्टल नाही तर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या गाभ्यानुसार मातृभाषेतून जगभरातील मराठी भाषिक व सर्वस्तरातील विद्यार्थ्यांना जीवनात व व्यवहारात उपयोगी पडेल असे जागतिक व उच्च दर्जाचे शिक्षण ऑनलाईन पद्धतीने देणे हा आहे. तसेच भारतीय ज्ञान परंपरेच्या अंतर्गत (आयकेएस - इंडियन नॉलेज सिस्टीम) भारतीय परंपरेची जाणीव व अभिमान निर्माण करणे हा देखील यामागे उद्देश आहे. मुक्त विद्यापीठाने आजीव ऑनलाईन शिक्षणाची कास व्यवस्थितरित्या धरल्यामुळे राज्य शासनाच्या या प्रकल्पाचे नेतृत्व मुक्त विद्यापीठाकडे सोपविण्यात आले व अल्पावधीत त्यांनी त्याची व्यावसायिकरित्या सुरुवात करून दाखवली असे गौरवोद्गार देखील त्यांनी काढले.

यावेळी बोलताना विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी या प्रकल्पासाठी [illegible] पुणे, छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व एसएनडीटी विद्यापीठ कोल्हापूर यांचा सक्रिय सहभाग असल्याचे सांगितले. तसेच आगामी काळात शासन निर्देशानुसार या शैक्षणिक प्रकल्पाचा विस्तार करणार असून विद्यापीठ मिळून एक 'शैक्षणिक कंपनी' स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले. विद्यापीठाच्या डिजीटल शिक्षण विद्याशाखा संचालिका इन्टिग्रेटेड प्राध्यापिका डॉ. कविता साळुंके यांनी 'महाज्ञानदीप' या ऑनलाईन शिक्षण पोर्टल [illegible] पाटील यांच्या हस्ते विद्यापीठ आवारात देशी वृक्षाची लागवड करण्याचा शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. डॉ. [illegible] यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी - कर्मचारी शैक्षणिक संयोजक





Scanned with CamScanner



